# १ मूलभूत संकल्पना

## व्याख्या -


- **प्रा. ग्रेगरी ग्रॉसमन** :- देशातील व्यक्ती, कुटुंबे उद्योगसंस्था व व्यवसाय संस्था यांच्या मार्फत उत्पादण, विभाजन व उपभोग या आर्थिक क्रिया पार पाडल्या जातात. देशातील विविध घटक व संस्थांना वळण लावण्यासाठी ज्या यंत्रणेचा वापर केला जातो त्यास **अर्थव्यवस्था** असे म्हणतात.

- **प्रा. लाऊकस** :- मानवी गरजा भागविताना आपली साधन सामग्री वापरण्याचे कार्य अंगिकारण्यासाठी एखादे राष्ट्र करीत असलेले समग्र व्यवहार म्हणजे **अर्थव्यवस्था** होय.

**आर्थिक क्रिया :-**




**उत्पादन (Production),**



**विभाजन (Distribution),**



**विनिमय (Exchange),**



**उपभोग (Consumption)**

**या चार आर्थिक क्रिया यांचा समावेश अर्थव्यवस्थेमध्ये होतो.**




## अर्थव्यवस्थेचे वर्गीकरण

**(I) उत्पादन साधनाच्या मालकीनुसार**

- भांडवलशाही - Capitalism
- समाजवाद - Socialism
- मिश्र - Mixed Economy


**(II) विकासानुसार**

- विकसित - Developed
- विकसनशिल - Underdeveloping
- अविकसित - Undeveloped

**(III) नियंत्राणानुसार**

- मुक्त अर्थव्यवस्था - Open Economy
- बंदिस्त अर्थव्यवस्था - Closed Economy

# भांडवलशाही अर्थव्यवस्था



- **व्याख्या** - भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणजे ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादनांच्या साधनांचा मालकी हक्क खाजगी उत्पादकांकडे असतो अशी अर्थव्यवस्था होय.
- भांडवलशाही अर्थवव्यवस्थेला मुक्त अर्थव्यवस्था असेही म्हणतात.
- **निर्मिती** - ॲडम स्मिथ यांच्या विचारामधून व व्यापारवादामधून भांडवशाहीची निर्मिती झाली आहे.
  - 1776 - Wealth of Nation **या ग्रंथात भांडवलशाही बाबत विचार मांडले आहेत**.
- **स्वरुप** - मुक्त अर्थव्यवस्था / खाजगी अर्थव्यवस्था.
- **उत्पादनाची मालकी** - खाजगी उत्पादकाकडे.
- **उद्देश** - महत्तम नफाप्राप्ती.
- **आर्थिक नियोजन** - प्रलोभनात्मक नियोजनाचा वापर.
- **शासकीय हस्तक्षेप** - शासकीय निर्हस्तक्षेप असतो. (Government Laissez - Faire)
- **भांडवलशाही असलेले देश** - इंग्लंड, अमेरिका, जपान, जर्मनी, युरोपियन देश, इत्यादी.


**गुण**
- देशांतर्गत उत्पादनात वाढ घडुन येते.
- अर्थव्यवस्थेत दर्जेदार वस्तुचे उत्पादन.
- महत्तम नफा प्राप्ती.
- वेगवान आर्थिक विकास
- उत्पादन साधनांचा कार्यक्षम वापर
- व्यक्तीहितास महत्त्व
- तांत्रिक प्रगती
- लवचिकता
- व्यवसाय कुशलतेत वाढ

**दोष**
- आर्थिक विषमतेत वाढ
- वर्गसंघर्ष घडून येतो
- राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष
- संपत्तीचे केंद्रिकरण
- सामाजिक कल्याण दुय्यम
- नफेखोरीच्या प्रमाणात वाढ
- श्रमिकाला दुय्यम स्थान

- **व्याख्या** - समाजवादी अर्थव्यवस्था म्हणजे ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांची मालकी शासन यंत्रणेकडे असते किंवा शासनाकडुन नियंत्रित केली जाते अशी अर्थव्यवस्था होय.

**भांडवलशाहीचे वैशिष्टे**
- बाजार यंत्रणा
- खाजगी मालकी
- सक्षम नियंत्रण
- शासकीय निर्हस्तक्षेप
- ग्राहक केंद्रित अर्थव्यवस्था
- स्पर्धात्मकता
- उत्पादन घटकांचा कार्यक्षम वापर
- मुक्त अर्थव्यवस्था
- अधिकविनिमय मूल्य
- आर्थिकवाढ/व्यक्तीहित

# समाजवादी अर्थव्यवस्था



- समाजवादी अर्थव्यवस्था नियोजित व नियंत्रित अर्थव्यवस्था असते.

- **निर्मिती** - जर्मन तत्ववेते **कार्ल मार्क्स** (Karl Marks) यांनी भांडवलशाहीमधील दोष दुर करुन समाजवादी अर्थव्यवस्था मांडली आहे.

  मार्क्स यांनी Das Capita, Communist Manifesto या दोन ग्रंथाची निर्मिती केली आहे.

  **लेनीन आणि स्टॅलिन** या दोघांनी समाजवादी विचारसरणीचा प्रसार आणि प्रचार केला आहे.

- **स्वरुप** - समाजवादी अर्थव्यवस्था नियंत्रित (Controled) व नियोजित (Planned) अर्थव्यवस्था होय.

- **उत्पादनाची मालकी** - सार्वजनिक उत्पादकाकडे / शासनाकडे.

- **उद्देश** - समाजहीत / राष्ट्रहीत

- **आर्थिक नियोजन** - आदेशात्मक नियोजनाचा वापर.


- **तत्त्व** - समाजवादी समाज रचना.

- **शासनाचा हस्तक्षेप** - शासनाचे पुर्ण नियंत्रण

- **समाजवादी अर्थव्यवस्था असलेले देश** - रशिया, चीन, क्युबा, व्हिएतनाम, फिनलँड, नेदरलँड, कॅनडा, स्वीडन, नॉर्वे, आर्यलँड, न्युझीलँड, बेल्जियम

**समाजवादी अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्ये**

- शासकीय नियंत्रण
- सर्वांना समान संधी
- राष्ट्रकेंद्रित अर्थव्यवस्था
- शासकीय मालकी
- नियोजित अर्थव्यवस्था



# मिश्र अर्थव्यवस्था

- भांडवलशाही व समाजवाद या दोन अर्थव्यवस्थेचे एकत्रीकरण म्हणजे मिश्र अर्थव्यवस्था होय.
- **व्याख्या** - ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांचा मालकी हक्क शासन व खाजगी उत्पादक दोघांकडे असतो अशा अर्थव्यवस्थेला **मिश्र अर्थव्यवस्था** म्हणतात.
- **निर्मिती - केंब्रीज अर्थतज्ज्ञ लॉर्ड जे.एम. केन्स** यांच्या विचारातून झाली आहे. केन्स यांनी 1936 मध्ये प्रकाशित केलेल्या The General Theory of Employment Interest and Money या ग्रंथात मिश्र अर्थव्यवस्थेविषयी विचार मांडले आहेत.
- **स्वरुप** - संयुक्त मालकीची अर्थव्यवस्था
- **उत्पादनाची मालकी** - खाजगी व सार्वजनिक उत्पादकाकडे
- **उद्देश** - काही प्रमाणात नफा व काही प्रमाणात राष्ट्रहीत दोन्ही
- **आर्थिक नियोजन** - सुचक / लोकशाहीवादी नियोजनाचा वापर.
- 1948 मध्ये सर्वप्रथम **फ्रान्समध्ये** मिश्र अर्थव्यवस्थेचा वापर करण्यात आला.
- **शासनाचे नियंत्रण** - काही प्रमाणात शासनाचे नियंत्रण.
- **मिश्र अर्थव्यवस्था असलेले देश** - भारत, कॅनडा, फ्रान्स, हाँगकाँग, स्वीडन, आईसलँड.

**मिश्र अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्ये**

- संयुक्त अर्थव्यवस्था
- शासकीय व बाजार अर्थव्यवस्था
- संयुक्त धोरण
- दोन्ही क्षेत्रांचे नियंत्रण
- अवजड उद्योगांचा विकास
- सार्वजनिक क्षेत्राचा विकास

**गुण**

- आर्थिक समता प्रस्तापित
- समतोल विकास
- स्पर्धेमुळे किमती कमी
- अती महत्त्वाच्या सेवा शासनाकडे
- सार्वजनिक क्षेत्रात वृद्धी

**दोष**

- दोन क्षेत्राचे प्राबल्य
- नियोजनास कठीण
- आर्थिक समता प्राप्त होतेचे असे नाही

**भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थित्यांतरे / बदल**

- **1947 पुर्वी** मुक्त अर्थव्यवस्था
- **1948 पासून** मिश्र अर्थव्यवस्था (पहिले औद्योगिक धोरण)
- **1950 ते 1980 पर्यंत** नियोजनाचे प्राबल्य
- **1991 नंतर** मुक्त अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

## विकासानुसार

### १. विकसित अर्थव्यवस्था

ज्या राष्ट्रातील लोकांचे दरडोई उत्पन्न उच्च असेल, मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण व शहरीकरण झाले असेल, साक्षरतेचा उच्च दर असेल आणि जन्मदर व मृत्यूदर प्रमाणात घट झाली असेल तर अशा देशास विकसित राष्ट्र असे म्हणतात. उदा. अमेरिका, इंग्लंड, जपान, जर्मनी, इत्यादी

### २. विकसनशिल अर्थव्यवस्था

- विकसिनशील अर्थव्यवस्था म्हणजे असे देश जे आर्थिकदृष्ट्या मागास आहेत किंवा ज्या देशात आर्थिक विकास प्रक्रिया सुरु झाली आहे अशी राष्ट्रे विकसनशील राष्ट्र म्हणुन ओळखले जातात.

### ३. अविकसित अर्थव्यवस्था

- ज्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे दरडोई उत्पन्न अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नाच्या 1/4 पेक्षा कमी असेल तर ती राष्ट्र अविकसीत/अप्रगत समजली जातात.



**जागतिक विकास अहवालानुसार (world Development Report) अर्थव्यवस्थेचे वर्गीकरण -**

| | वर्गीकरण | जुलै 2015 | जुलै 2020 GNI-PPP-PCI | देश |
|---|---|---|---|---|
| A) | High income Group | 12,736$ पेक्षा जास्त | 12,535 पेक्षा जास्त | विकसित देश |
| B) | Medium Income Group<br>i) High medium<br>ii) Low medium | 1045-12736$<br>4125-12,736$<br>1045-4125$ | 12,535-1036$<br>12,535-4046<br>4046-1036$ | विकसनशिल देश |
| C) | Low Income Group | 1025$ पेक्षा कमी | 1036$ पेक्षा कमी | अविकसित देश |

**मानव विकास अहवाल 2020 नुसार अर्थव्यवस्थेचे वर्गीकरण**

**HDI चे मूल्यानुसार वर्गीकरण**

- Very High Human Development - **0.898**
- High Human Development - **0.753**
- Medium Human Development - **0.631**
- Low Human Development - **0.513**

| भारत | HDI | GII | GDI | MPI | IHDI |
|---|---|---|---|---|---|
| | 0.645 | 0.488 | 0.820 | 27.9 | 0.475 |

**अर्थव्यवस्थेचे क्षेत्र**

| | उत्पादनानुसार | मालकीनुसार |
|---|---|---|
| 1) | **प्राथमिक क्षेत्र**<br>कृषी, मत्स्य, जंगलसंपत्ती, खाणकाम, पशुपालन, खनिज उत्पादने | सार्वजनिक क्षेत्र |
| 2) | **द्वितीयक क्षेत्र**<br>कापड, साखर, लोह-पोलाद, अन्न-धान्य, प्रक्रिया उद्योग, इत्यादी | खाजगी क्षेत्र |
| 3) | **तृतीयक क्षेत्र**<br>वितरण सेवा, व्यवसाय सेवा, ग्राहक सेवा, विनाशुल्क सेवा, इत्यादी. | संयुक्त क्षेत्र |
| 4) | **चतुर्थक क्षेत्र**<br>संशोधन आणि बौद्धिक कार्य-शिक्षण, आरोग्य, संरक्षण, IT, इत्यादी. | सहकारी क्षेत्र |
| 5) | **पंचमक क्षेत्र**<br>सर्वोच्च स्तरावरील निर्णय प्रक्रिया. | |

## नियंत्रणानुसार अर्थव्यवस्थेचे प्रकार

| मुक्त अर्थव्यवस्था (Open Economy) | बंदिस्त अर्थव्यवस्था (Closed Economy) |
|---|---|
| ▪ मुक्त अर्थव्यवस्था ही अशी व्यवस्था होय ज्यामध्ये आर्थिक व्यवहारावर कोणते ही बंधने नसतात. | ▪ बंदिस्त अर्थव्यवस्था म्हणजे आर्थिक व्यवहारावर बंधने लादलेली असतात. |
| ▪ आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये अडथळे नसतात अशी अर्थव्यवस्था. | ▪ आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये बंधने निर्माण होतात. |
| ▪ खुल्या अर्थव्यवस्थेत प्रवेशासाठी कोणतेही विशेष बंधने नसतात पण प्रतिस्पर्धी अडथळे असु शकतात. | ▪ व्यापार व उत्पादनासाठी मुक्त प्रवेश नसतो. |
| ▪ अमेरिका, कॅनडा, प. युरोप आणि ऑस्ट्रेलिया ह्या देशात मुक्त अर्थव्यवस्था आहे. | ▪ बंदिस्त अर्थव्यवस्था ही मुक्त अर्थव्यवस्थेच्या विरुद्ध प्रक्रिया आहे. |
| ▪ मुक्त अर्थव्यवस्था ही संकल्पना ॲडम स्मिथ यांनी मांडली. अशा अर्थव्यवस्थेत शासनाचा हस्तक्षेप नसतो म्हणजे शासनाचा निर्हस्तक्षेप असतो. | ▪ बंदिस्त अर्थव्यवस्थेला संरक्षणवादी अर्थव्यवस्था म्हणतात. |

# सागरी अर्थव्यवस्था (Blue Economy)

- Blue Economy ही एक स्थुल अर्थशास्त्रीय संकल्पना आहे.
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या धोरणानुसार (India's Blue Economy) हे धोरण तयार करण्यात आले आहे.
- **धोरणाचा मसुदा** : भूविज्ञान मंत्रालयाकडून तयार करण्यात आला.

## Blue Economy Concept :-

- "पर्यावरणाच्या दृष्टीने उपयुक्त, आर्थिक आणि व्यापक सामाजिक फायदे असलेले उपाय तयार करण्यासाठी, नैसर्गिक जगात पर्यावरणीय समस्यांचा विकास करणे व त्या संबंधित संभाव्य फायद्यावर त्यात प्रकाश टाकण्यात आला आहे."
- ही संकल्पना सर्वप्रथम 'Gunter Pauli' यांनी 2010 मध्ये मांडली आहे.
- 2010 मध्ये The Blue Economy Version 2.0 ह्या पुस्तकात ही संकल्पना मांडली आहे.
- यापुर्वी Rio + 20 2012 मधील शिखर परिषदेत मांडण्यात आली.
- 2015 ते 2030 या काळात निश्चित करण्यात आलेल्या शाश्वत लक्ष्यापैकी (SDG's) एक लक्ष्ये यावर आधारित आहे. पाण्याखालील जीवन सुधारणे असे लक्ष्ये निर्धारित करण्यात आले होते.

## ब्ल्यू इकॉनॉमिचा अर्थ :-

- ही बहुआयामी व आंतरक्षेत्रिय संकल्पना होय. त्यात समुद्रातील नैसर्गिक स्त्रोतांसह किनारपट्टीवरील पायाभूत सुविधा, देशातील विविध भागांना जोडणारे जलमार्ग आंतरराष्ट्रीय व्यापार, ऊर्जा स्त्रोत, उद्योन्मुख सागरी तंत्रज्ञान, मासेमारी, पर्यटन, सुरक्षा शाश्वतता यांचा समावेश होतो. असे धोरण मसुद्यात नमुद करण्यात आले आहे.

## उद्दिष्ट्ये :-

देशाच्या तीन दिशांना लाभलेला समुद्र आणि किनारपट्टीचा शाश्वत वापर करुन सागरी अर्थव्यवस्था निर्माण करणे. सागरी अर्थव्यवस्थेच्या माध्यमातुन GDP मध्ये वाढ घडून आणने. "भूविज्ञान मंत्रालयाने सात समित्यांच्या माध्यमांतून इंडियाज ब्ल्यू इकॉनॉमी हे धोरण तयार केले आहे."

## महत्त्वाचे घटक :-

- देशाला 7000 किमी पेक्षा अधिक लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे.
- 12 मोठ्या व 187 छोट्या बंदराच्या माध्यामतुन 140 दशलक्ष टन कार्गो हाताळले जाते.
- भारतातील 40 लाख मच्छीमार कुटुंब सागरी अर्थव्यवस्थेवर अवलंबून.
- सागरी अर्थव्यवस्थेचा GDP मधील वाटा 4.1% आहे.

## या धोरणात सात प्रमुख घटकावर भर :-

- नॅशनल अकाऊंटिंग नेटवर्क फ्रेमवर्क फॉर ब्ल्यू इकॉनॉमी ॲंड ओशन गव्हर्नन्स्.
- सागरी आवकाशाचे नियोजन आणि पर्यटन.
- मासेमारी व मत्स्यप्रक्रिया.
- उत्पादन उद्योन्मुख उद्योग.
- व्यापार
- तंत्रज्ञान सेवा
- कौशल्य विकास.

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# मोदी शासनाच्या काळातील सर्व योजना 2014 ते 2021

| क्र. | शासकीय योजना | सुरुवात |
|---|---|---|
| 1. | जन धन योजना | 28 ऑगस्ट, 2014 |
| 2. | स्किल इंडिया मिशन | 28 ऑगस्ट, 2014 |
| 3. | मेक इन इंडिया | 28 सप्टेंबर, 2014 |
| 4. | स्वच्छ भारत मिशन | 2 ऑक्टोबर, 2014 |
| 5. | संसद आदर्श गाव योजना | 11 ॲक्टोबर, 2014 |
| 6. | श्रमेव जयते योजना | 16 ऑक्टोबर, 2014 |
| 7. | बेटी बचाओ बेटी पढाओ | 22 जानेवारी, 2015 |
| 8. | ह्दय योजना | 21 जानेवारी, 2015 |
| 9. | प्रधानमंत्री मुद्रा योजना | 8 एप्रिल, 2015 |
| 10. | उजाला योजना | 1 मे, 2015 |
| 11. | अटल पेंशन योजना | 9 मे, 2015 |
| 12. | प्रधानमंत्री जीवन ज्योति बीमा योजना | 9 मे, 2015 |
| 13. | प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना | 9 मे, 2015 |
| 14. | स्मार्ट सिटी योजना | 25 जुन, 2015 |
| 15. | अमृत योजना | 25 जुन, 2015 |
| 16. | डिजिटल इंडिया मिशन | 2 जुलै, 2015 |
| 17. | स्वर्ण मौद्रिकरण योजना | 5 नोव्हेंबर, 2015 |
| 18. | स्वर्ण रोखे ठेव योजना | 5 नोव्हेंबर, 2015 |
| 19. | उदय योजना | 2015 |
| 20. | स्टार्ट-अप इंडिया | 16 जानेवारी, 2016 |
| 21. | सेतु भारतम योजना | 4 मार्च, 2016 |

| क्र. | शासकीय योजना | सुरुवात |
|---|---|---|
| 22. | स्टँड-अप इंडिया | 5 एप्रिल, 2016 |
| 23. | ग्रामोदय से भारत उदय | 14-24 एप्रिल, 2016 |
| 24. | प्रधानमंत्री उज्ज्वला योजना | 1 मे, 2016 |
| 25. | नमामि गंगे योजना | 7 जुलै, 2016 |
| 26. | आत्मनिर्भर भारत योजना | मे, 2020 |
| 27. | मिशन कर्मयोगी | 2 सप्टेंबर, 2020 |
| 28. | पी.एम. स्वनिधी योजना | 1 जुन, 2020 |
| 29. | अन्न प्रक्रिया उद्योग योजना Vocal to Local | 29 जुन, 2020 |
| 30. | कपिला कलाम योजना | 15 ऑक्टोबर, 2020 |
| 31. | प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना | 10 सप्टेंबर, 2020 (निळी क्रांती) |
| 32. | राष्ट्रीय डिजीटल आरोग्य अभियान | 15 ऑगस्ट, 2020 |
| 33. | सोलर चक्र अभियान | 27 जुन, 2018 |
| 34. | स्वामीत्व योजना | 24 एप्रिल, 2020 |
| 35. | समर्थ योजना | |
| **36.** | **सहकार प्रज्ञा योजना** | 24 नोव्हेंबर, 2020 |
| 37. | पीएम स्वानिधी योजना | 18 जुलै, 2020 |
| 38. | नवी शिक्षा निती योजना | 30 जुलै, 2020 |
| 39. | निष्ठा योजना शिक्षक प्रशिक्षक अभियान | 2 सप्टेंबर, 2019 |
| 40. | ASEEM पोर्टल | 9 जुलै, 2020 |
| 41. | Affordable Rental Housing Complex (ARHC) Scheme | 9 जुलै, 2020 |
| 42. | SERB Accelerate Vigyan Scheme | 2 जुलै, 2020 |